मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्प आदर्शवत!

## महापालिकेचा आंतरराष्ट्रीय झिरो वेस्ट दिन अनोख्या उपक्रमांनी साजरा

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने दापोडी येथील आनंदवन झिरो वेस्ट प्रकल्पात आंतरराष्ट्रीय शून्य कचरा दिन उत्साहपूर्ण व नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, तसेच सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या पथनाट्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शून्य कचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे चार प्रकारे विलगीकरण, सिंगल यूज प्लास्टिकवरील बंदी, कापडी पिशव्यांचा वापर, ‘आर.आर.आर. सेंटर’ची संकल्पना तसेच घरगुती कंपोस्टिंग यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर नाट्यमय व प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

तसेच उपस्थितांना दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्पाची सविस्तर माहिती देत कचरा व्यवस्थापनातील आधुनिक उपाययोजनांची ओळख करून देण्यात आली. या कार्यक्रमास सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, दीपक कोटीयाना, आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे, नितीन तुपे, सचिन जाधव, ओंकार शिवणकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# आयुक्तांचे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी, गैरजबाबदार आणि शहराच्या अस्मितेला धक्का देणारे; आमदार अमित गोरखे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत ‘पिंपरी चिंचवडला जगात कोण ओळखतं?’ असे केलेले वक्तव्य अत्यंत दुर्दैवी, गैरजबाबदार आणि शहराच्या अस्मितेला धक्का देणारे आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केली आहे.

देशाच्या नकाशावर ठळकपणे उमटलेले महत्त्वाचे केंद्र पिंपरी चिंचवड हे केवळ एक शहर नसून, औद्योगिक, सामाजिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या देशाच्या नकाशावर ठळकपणे उमटलेले एक महत्त्वाचे केंद्र आहे. पिंपरी चिंचवड हे शहर जागतिक स्तरावर औद्योगिक प्रगतीसाठी ओळखले जाते. टाटा मोटर्स, मर्सिडीज बेंझ, फोक्सवॅगन, बजाज ऑटो यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या उद्योगसंस्था येथे कार्यरत असून, देशाच्या आर्थिक विकासात मोठे योगदान देत आहेत. इतकेच नव्हे तर, पिंपरी चिंचवड हे संतांची परंपरा आणि सामाजिक चळवळींचे केंद्र राहिले आहे. संत तुकाराम महाराजांची पावन भूमी देहू आणि संत ज्ञानेश्वर महाराजांची आळंदी ही तीर्थक्षेत्रे याच परिसरात आहेत, ज्यामुळे देश-विदेशातून लाखो भाविक येथे येतात. त्यामुळे या शहराची ओळख केवळ औद्योगिक नाही, तर सांस्कृतिक आणि आध्यात्मिक स्तरावरही जागतिक आहे, असे प्रतिपादन देखील आमदार अमित गोरखे यांनी केले आहे.





पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील सर्वात सक्षम आणि सक्षम प्रशासन देणाऱ्या महानगरपालिकांपैकी एक मानली जाते. स्मार्ट सिटी, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील कामगिरीमुळे या शहराने राष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे. अशा परिस्थितीत आयुक्तांनी केलेले वक्तव्य हे शहराच्या प्रगतीकडे आणि नागरिकांच्या कष्टांकडे दुर्लक्ष करणारे आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहराचा इतिहास, सामाजिक-आर्थिक योगदान आणि नागरिकांची भावना समजून घेणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण निर्णयांमुळे पिंपरी चिंचवड शहराला आयटी क्षेत्रात वेगळी ओळख मिळाली असून ‘स्मार्ट सिटी’च्या दिशेनेही मोठी झेप घेता आली आहे. याच भक्कम पायावर आज हे शहर राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप निर्माण करत आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी-चिंचवडच्या गौरवशाली इतिहासाचा आणि औद्योगिक प्रगतीचा गांभीर्याने अभ्यास करावा, त्यानंतरच जबाबदारीने विधाने करावीत. शहराची जागतिक ओळख ही कष्टाने निर्माण झाली असून, अशा प्रकारची अनाठायी वक्तव्ये करणे अत्यंत दुर्दैवी आहे. पिंपरी चिंचवड हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचे अभिमानाचे शहर आहे. त्याची ओळख जगभर आहे, आणि ती अधिक भक्कम करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे, असेही आमदार अमित गोरखे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासकामांना स्थायी समितीची गती

## आरोग्य, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांच्या प्रस्तावांना मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत आज शहरातील विविध विकासकामे व विभागनिहाय प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे होते. यावेळी स्थायी समिती सदस्य शालिनी गुजर, मनीषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन, सविता आसवानी, शीतल वर्णेकर, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने, सुलभा उबाळे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



> पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आजच्या स्थायी समिती बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली आहे. प्रामुख्याने आरोग्य सुविधांचे सक्षमीकरण, पाणीपुरवठा यंत्रणेतील तांत्रिक सुधारणा आणि प्रलंबित रस्ते विकासाच्या कामांवर आम्ही भर दिला आहे. जिजामाता रुग्णालयातील विद्युत कामे असोत किंवा रावेत उपसा केंद्राची दुरुस्ती, नागरिकांना अखंडित सेवा मिळावी हाच आमचा उद्देश आहे. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी संक्रमण शिबिराची उपलब्धता आणि महापालिका शाळांमधील सुविधांच्या दुरुस्तीमुळे सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य होण्यास मदत होईल. शहराच्या हिताचे हे सर्व प्रकल्प कालबद्ध मर्यादित पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.
>
> - अभिषेक बारणे (सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका)

बैठकीत शहरातील विविध विकासकामांशी संबंधित प्रस्तावांवर चर्चा करून त्यांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये पिंपरी येथील नवीन जिजामाता रुग्णालयातील विद्युत देखभाल व दुरुस्ती कामांसाठी खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत शाळा, इमारती व कार्यालयांमधील हमी कालावधी संपलेले नादुरुस्त इन्व्हर्टर व बॅटरी बदलणे, आवश्यकतेनुसार नवीन इन्व्हर्टर बसविणे व संबंधित कामांसाठी खर्चास मंजुरी देण्यात आली.

भोसरी (मौजे कासारवाडी) येथील स. नं. ४९८ मधील मंजूर विकास योजनेनुसार प्रस्तावित १२ मीटर रस्त्यासाठी भूसंपादन करण्यासही मान्यता देण्यात आली. रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रातील १६०० किलोवॅट क्षमतेच्या रोहित्र संच व ब्रेकर्सच्या देखभाल-दुरुस्ती तसेच संबंधित कामांसाठीही खर्च मंजूर करण्यात आला. तसेच सेक्टर १० येथे पर्यायी ट्रान्सफॉर्मर व आरएमयू युनिट बसविण्यास मंजुरी देण्यात आली.

याशिवाय, विविध पंपिंग हाऊस येथे सॉफ्ट स्टार्टर बसविणे, झोपडपट्टीधारकांच्या तात्पुरत्या पुनर्वसनासाठी चिंचवड (सर्व्हे नं. २९/२) येथील सुमारे ३० हजार चौ. फुट जागा संक्रमण शिबिरासाठी ३ वर्षे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ६ मधील पाणीपुरवठा ट्रेंचेसचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे तसेच पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती करणे यांसारख्या कामांना मंजुरी देण्यात आली.

थेरगाव गावठाण पंप हाऊस येथील पंपाची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक विद्युत कामे, तसेच पुणे महानगर परिवहन मंडळाच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील संचलन तुटीच्या लेखापरीक्षण अहवालाच्या अवलोकनासाठी खर्चासही मान्यता देण्यात आली.

वैद्यकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी १९ टाटा सुमो अथवा तत्सम वाहने २ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घेण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच प्रभाग क्र. ८ मधील पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉग शेड परिसरातील किरकोळ स्थापत्य दुरुस्ती, विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था, प्रभाग क्र. ९ व २ मधील स्वच्छतागृह दुरुस्ती, तसेच मासुळकर कॉलनी, यशवंतनगर आदी भागांतील दुरुस्ती कामांसाठीही खर्चास मान्यता देण्यात आली.

निगडी सेक्टर २३ येथील उद्यानातील स्थापत्य कामे, कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्रासाठी सीमाभिंत बांधकाम, तसेच सांगवी-किवळे रस्त्यावरील बस थांब्यांची देखभाल व दुरुस्ती यांसारख्या कामांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली.

# भाजपा मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचा कर भरणा निर्धारीत वेळेतच!

## भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची माहिती; कर संकलन विभागाकडून माहिती मिळताच भरणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन प्रक्रियेतील त्रुटींमुळे भाजपा मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचा मिळकतकर वेळेत भरला गेला नसल्याची बाब समोर आली होती. मात्र प्रशासनाकडून सूचना मिळताच संबंधित कराची रक्कम निर्धारित वेळेत भरण्यात आल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिली आहे.

महानगरपालिकेकडून मिळकतकर वसुलीसाठी खासगी संस्थांच्या माध्यमातून पावत्या वितरित केल्या जातात. याच प्रक्रियेत संबंधित कार्यालयाला कर पावती वेळेत प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे कर भरण्यात विलंब झाला. ३१ मार्च हा कर भरण्याचा अंतिम दिवस असल्याने प्रशासनाने ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर तातडीने कारवाई करत संपूर्ण थकबाकी भरल्याचे काटे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, महापालिकेकडून सर्वसामान्य नागरिकांकडून कर वसुलीसाठी कडक भूमिका घेतली जाते. थकबाकीदारांवर मालमत्ता जप्त करणे, पाणीपुरवठा बंद करणे अशा कठोर उपाययोजना केल्या जातात. अशा परिस्थितीत सत्ताधारी पक्षाच्या कार्यालयावरच पाच वर्षांचा कर थकीत असल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आल्यानंतर चर्चा रंगली होती.



> नियम सर्वांसाठी समान आहेत. कोणतीही तांत्रिक अडचण असली तरी जबाबदारी टाळली जाणार नाही. आम्ही निर्धारित वेळेत कर भरून पारदर्शकता आणि आमचे उत्तरदायित्व जपले आहे. राजकीय उद्देशाने टीपणणी करणाऱ्यांनी निश्चिंत राहावे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही आपल्या कर्तव्याप्रती कटिबद्ध आहोत.
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

या पार्श्वभूमीवर शत्रुघ्न काटे यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थिती स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, "भारतीय जनता पक्ष सत्तेत असला तरी कर भरण्यापासून कोणतीही सूट मिळत नाही. आम्ही नियमांनुसार कराची रक्कम भरली आहे." अभय योजनेची मुदत ३१ मार्च पर्यंत होती. त्या मुदतीमध्ये कर भरणा जमा करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, या प्रकरणावरून होत असलेल्या राजकीय टिपण्णीबाबत काटे यांनी नाराजी व्यक्त केली. अपूर्ण माहितीच्या आधारे किंवा राजकीय हेतूने चुकीच्या चर्चा करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात अशा प्रकारच्या तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय ठेवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे महापालिकेच्या कर संकलन प्रक्रियेतील त्रुटी अधोरेखित झाल्या असून, पावती वितरण यंत्रणा अधिक कार्यक्षम करणे आणि समन्वय अचूक करण्याची गरज आहे, असे स्पष्ट होत आहे.

# पाषाणमध्ये हायटेक 'पासपोर्ट सेवा केंद्र'

## हिंजवडी, बाणेरकरांसाठी खुशखबर! मुंढव्यातील कार्यालय बंद

**पुणे | प्रतिनिधी**

जागा अपुरी पडत असल्याने मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राचे (पीएसके) पाषाण येथे स्थलांतर करण्यात आले. वाढती गर्दी आणि अत्याधुनिक सुविधांमुळे हा निर्णय घेतल्याचे क्षेत्रीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

दरम्यान, ३० मार्चनंतर मुंढवा केंद्राची 'अपॉइंटमेंट' घेतलेल्या नागरिकांनी पाषाण येथील नवीन केंद्रात त्याच तारखेला आणि दिलेल्या वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

बाणेर-पाषाण लिंक रस्त्यावरील 'मॉटक्लेयर बिल्डिंग' या नवीन वास्तूत या केंद्राचे कामकाज सोमवारपासून सुरू झाले. या पार्श्वभूमीवर गायकवाड यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बाणेर, पाषाण, औंध, बावधन आणि हिंजवडी आयटी पार्क परिसरातील नागरिकांसाठी हे नवीन केंद्र अधिक सोयीचे ठरणार असून, नव्या कार्यालयात आधुनिक सुविधा असल्याचे गायकवाड यांनी नमूद केले.

ते म्हणाले, 'पुण्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण होत आहे. ग्लोबल कपॅसिटी सेंटर आणि काही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय कंपन्या पुण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पारपत्राची सुविधा जलद आणि सोयीसुविधांनी युक्त असणे गरजेचे आहेत. पारपत्रासाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने वाढत आहे. वाढत्या गर्दीमुळे मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राची जागा अपुरी पडत होती. हिंजवडी आणि परिसरातील आयटी कंपन्यांच्या दृष्टिने अंतराचाही प्रश्न होता. त्यामुळे या केंद्राचे स्थलांतर करण्यात आले. आता नव्या पारपत्र सेवा केंद्रात सुसज्ज जागा आणि अधिक सोयीसुविधा आहेत.'




'पारपत्रासाठीचे अर्ज नाकारता येत नाहीत. पडताळणी केल्यानंतर निकषांनुसार प्रत्येकाला पारपत्र द्यायचे असते. त्यासाठीची अर्जप्रक्रिया जलद करण्याच्या दृष्टिने अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. काही प्रमाणात अर्जांची छाननी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवण्यात आली आहे. फेब्रुवारीच्या एका महिन्यात ४० हजारांहून अधिक सुमारे ९० टक्के अर्जदारांना पारपत्र देण्यात आले, तर कागदपत्रांच्या अभावामुळे आणि पडताळणीत आढळलेल्या त्रुटींमुळे काही अर्ज नाकारण्यात आले,' असेही त्यांनी नमूद केले.

# पुण्यातील अंतर्गत रिंग रोड रखडला; भूसंपादनावरून वाद

## पीएमआरडीए आणि महापालिकेत निधीवर मतभेद; अंतिम निर्णय मुख्यमंत्र्यांच्या हातात

**पुणे | प्रतिनिधी**


पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित अंतर्गत रिंग रोड प्रकल्पाचे काम भूसंपादनाच्या निधीवरून रखडले आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या संपादनाचा खर्च कोण करणार? यावरून पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हात वर केल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीला विलंब होत आहे.

ज्या गावांमध्ये भूसंपादन करायचे आहे, ती गावे महापालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर त्या भागातील विकास प्राधिकरण म्हणून महापालिकेला अधिकार दिले आहेत. त्यामुळे रिंग रोडसाठीचा खर्च पीएमआरडीएने करावा की महापालिकेने? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. परिणामी, भूसंपादनाची प्रक्रिया थांबली असून, याबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी आता चेंडू मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात गेला आहे. त्यांच्या निर्णयावरच या प्रकल्पाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

वाहतूकव्यवस्थेला पर्यायी मार्ग म्हणून दोन रिंग रोड प्रकल्प प्रस्तावित आहेत. राज्य रस्ते विकास महामंडळाकडून बाह्य रिंग रोडचे काम सुरू आहे, तर दुसरीकडे अंतर्गत रिंग रोड प्रकल्पाची जबाबदारी पीएमआरडीएकडे आहे. या रस्त्यासाठी 13 गावांमधील 115 हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावे लागणार आहे. संबंधित जमिनींचे प्रस्ताव प्राधिकरणाने यापूर्वीच जिल्हा प्रशासनाकडे सादर केले असून, त्यानुसार 11 गावांतील जमिनींची मोजणी व मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

प्राधिकरणाने निधी उपलब्ध करून दिल्यानंतर थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन सुरू होणे अपेक्षित होते. दरम्यान, न्यायालयीन वाद निर्माण झाल्यामुळे राज्य सरकारने पीएमआरडीएचा प्रारूप विकास आराखडा रद्द केला होता. त्यानंतर संबंधित गावांमधील बांधकामासह सर्व विकास अधिकार पीएमआरडीएकडून काढून घेऊन महापालिकेकडे वर्ग करण्यात आले.

त्यामुळे या गावांतील भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यास प्राधिकरणाने नकार दर्शविला असून, हा खर्च महापालिकेने करावा, अशी भूमिका पीएमआरडीएने घेतली आहे. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे.




### या गावांमध्ये होणार भूसंपादन

» वडाची वाडी, भिलारेवाडी, पिसोळी, येवलेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, जांभूळवाडी, आंबेगाव खुर्द, कदमवाकवस्ती, सोळू, निरगुडी आणि वडगाव शिंदे.

# सायबर चोरट्यांकडून ज्येष्ठ नागरिक ‘लक्ष्य’

## सहकारनगर, कोथरुडमधील ज्येष्ठांची तीन कोटींची फसवणूक

**पुणे | प्रतिनिधी**

सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत दोन ज्येष्ठ नागरिकांची तीन कोटी १४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करण्याच्या बतावणीने सहकारनगर भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्यांनी एक कोटी ५२ लाख रुपयांची फसवणूक केली. दुसऱ्या एका घटनेत सायबर चोरट्यांनी कारवाईची भीती दाखवून कोथरूडमधील एका ज्येष्ठ महिलेची एक कोटी ६२ लाख रुपयांची फसवणूक केली.




या प्रकरणी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करण्याची बतावणी करुन सहकारनगरमधील एका ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी ५२ लाख रुपयांची फसवणूक करण्याात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर गेल्या वर्षी ७ डिसेंबर रोजी चोरट्यांनी संपर्क साधला होता. चोरट्यांनी त्यांना संदेश पाठविला होता. शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल, असे सांगून चोरट्यांनी त्यांना जाळ्यात ओढले.

त्यानंतर चोरट्यांनी फेब्रुवारी महिन्यापर्यंत चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी एक कोटी ५२ लाख रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर त्यांना परतावा दिला नाही. फसवूणक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक संगीता देवकाते तपास करत आहेत.

बँक खात्याचा काळ्या पैसे व्यवहारात वापर झाला असून, या प्रकरणात कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी एका महिलेची एक कोटी ६२ लाख रुपयांची फसवणूक केली. याबाबत ७७ वर्षीय ज्येष्ठ महिलेने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला कोथरूड भागात राहायला आहेत. बँक खात्याचा काळ्या पैसे व्यवहारात वापर झाला असून, २०० कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणात कारवाई करण्यात येणार आहे. या प्रकरणात अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे द्यावे लागतील, अशी भीती दाखवून चोरट्यांनी त्यांना पैसे जमा करण्यास सांगितले. वीस दिवसात चोरट्यांच्या खात्यात ज्येष्ठ महिलेने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी एक कोटी ६२ लाख रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. सायबर चोरट्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम गोठविण्याची विनंती बँकेकडे करण्यात येणार आहे. या प्रकरणी सायबर पोलिसांकडून तांत्रिक तपास सुरू करण्यात आला आहे.

### आयुष्यभराची पुंजी चोरट्यांच्या खात्यात

» सायबर चोरट्यांकडून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. निवृत्त ज्येष्ठ नागरिकांना वेगवेगळी आमिषे, तसेच कारवाईची भीती दाखवून चोरट्यांकडून फसवणूक केली जाते. आयुष्यभर पै-पै करुन साठविलेली रक्कम चोरट्यांच्या खात्यात जमा केली जाते. सायबर चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पुणे, साताऱ्यात पाणीटंचाई

## दोन्हीकडे साडेसात हजारांहून अधिक नागरिक तहानलेले

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या पावसाळ्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे पश्चिम महाराष्ट्रातील भीमा आणि कृष्णा खोऱ्यांतील सर्वच धरणांमध्ये चांगला पाणीसाठा आहे. पुणे विभागातील कोल्हापूर, सोलापूर आणि सांगली जिल्हे वगळता पुणे आणि सातारा जिल्ह्यांत पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत. दोन्ही जिल्ह्यांत १६ तालुक्यांमधील साडेसात हजारांहून अधिक नागरिक तहानलेले आहेत. यासाठी प्रशासनाकडून तातडीने खासगी, सरकारी १३ विंधन विहिरी आरक्षित करून १६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी पाणीटंचाई जाणवते, अशा तालुक्यांतील वाड्यावस्त्यांवरील नागरिकांना मागणीनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल, अशी माहिती प्रशासनाने दिली.

गेल्या वर्षी मोसमी पाऊस विलंबाने सुरू झाला. जूनच्या शेवटच्या आठवड्यात दमदार हजेरी लावणाऱ्या पावसाने जुलै महिन्यात दडी मारली होती. त्यानंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. ऑक्टोबर महिन्यापर्यंत पावसाच्या धारा कोसळत होत्या. त्यामुळे कृष्णा आणि भीमा खोऱ्यांतील धरणांमध्ये चांगला पाणीसाठा जमा झाला. मात्र, मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून तीव्र उन्हाळा आणि झळा बसण्यास सुरुवात झाली. सर्वाधिक टंचाई सातारा जिल्ह्यात बसत असून, या ठिकाणच्या माण, वाई, पाटण, खंडाळा, कराड या ठिकाणी जाणवत आहे; तर पुण्यातील आंबेगाव तालुक्यात पाणीटंचाई जाणवत आहे.



सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील दोन गावे आणि १९ वाड्यांवर ३ हजार २५१, वाई तालुक्यातील ४ गावे, ३ वाड्यांवरील ३ हजार ६५९ आणि पाटण तालुक्यातील २ वाड्यांवर ५९२ नागरिक पाणीटंचाईमुळे बाधित झाले आहेत. नागरिकांबरोबर पशुधनालाही पाणीटंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली असून, वाई आणि पाटण तालुक्यांतील अनुक्रमे १ हजार ४९५ आणि २९५ असे एकूण १ हजार ७९० पशुधन बाधित असल्याची माहिती विभागीय आयुक्तालयाकडून दिली.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार महिने उन्हाच्या तीव्र झळा वाढणार आहे. धरणातील पाण्याचा साठा मुबलक प्रमाणात शिल्लक असला, तरी जुलै महिन्यापर्यंत पाण्याचे नियोजन केले असून, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या तालुका, गाव, वाड्या वस्त्यांवर पाणीपुरवठा करण्यासाठी खासगी विहीर, विंधन विहीर ताब्यात घेण्यात येणार आहेत. ग्रामपंचायतीमार्फत जिल्हा प्रशासकीय पातळीवर प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त स्तरावर केले आहे.